**Responses of Teachers and Students on Yuva Track On Newspaper – Tarun Bharat**

## युवा ट्रॅकमधून युवांच्या कार्याला मिळाली कौतुकाची थाप



तरूण भारतचा 'युवा ट्रॅक' हा अंक गोव्यातल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील अज्ञात युवकांना प्रसिध्दीचा मंच प्राप्त करून देण्याचा यथोचित प्रयत्न करत आहे आणि ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे. माणसाला कुठल्याही चांगल्या कामासाठी एखादी कौतुकाची थाप मिळणे खूप गरजेचे असते, जी कित्येक युवकांना यातून मिळाली आहे. 'युवा ट्रॅक' मधून अनेक युवक प्रेरित झाले असतील यात अजिबात शंका नाही. या अंकाला पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा.

**–अश्विनी च्यारी**, सहाय्यक प्राध्यापक, सी. ई. एस महाविद्यालय, कुंकळी

## युवा ट्रॅक – एक वैचारिक मंच



'युवा ट्रॅक' ही पुरवणी म्हणजे आपले विचार मांडण्याचे युवकांसाठी एक उत्तम व्यासपीठ आहे. स्वामी विवेकानंद यांनी युवकांना आपल्या देशाचे मूलभूत अंग मानलेले आहे. युवाशक्तीचा वापर समाजकल्याणासाठी व्हावा ह्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील राहिले. हाच विचार ह्या पुरवणीद्वारे पुढे नेला जातो. मात्र युवा ट्रॅक अधिकाधिक तरुणांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. ह्या व्यासपीठाचा वापर करून विविध सामाजिक विषयांवर मौलिक चर्चा होणे गरजेचे आहे. तसेच, समाजमाध्यमांचा वापर करून वर्तमानपत्रांच्या वाचनापासून वंचित राहणाऱ्या युवा वर्गालाही ह्या समूहात समाविष्ट करून घेतले पाहिजे. एका वर्षाच्या अवधीत ह्या अंकाने कौतुकास्पद प्रगती केलेली आहे, त्याबद्दल दोन्ही मानकऱ्यांचे कौतुक केलेच पाहिजे. तरुण भारतचे युवा ट्रॅकरूपी व वृद्धिंगत अंकुर तसेच वृद्धिंगत रहावे हीच सदिच्छा.

**–प्रा. शुभलक्ष्मी नाईक गांवकर**, सी. ई. एस. महाविद्यालय, कुंकळी

## युवा ट्रॅक : युवकांसाठी एक नवी दिशा



युवा ट्रॅक या पुरवणीला एक वर्ष पूर्ण होत आहे ही एक अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. ही पुरवणी म्हणजे युवकांचे हक्काचे व्यासपीठ आहे. जिथे युवाशक्ती आपले विचार स्वतंत्रपणे मांडू शकते. इतर माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमांमुळे युवा वर्गाचे वाचन कमी झालेले असल्यामुळे आजचे खूप कमी तरुण वर्तमानपत्रे वाचताना दिसतात. त्यामुळे युवकांच्या अभिरुचीला व सवयींना जुळवून घेत इंस्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सॲप अशा विविध माध्यमांद्वारे युवकांशी आपण कनेक्ट होऊ शकतो. 'युवा ट्रॅक'च्या अकाउंटद्वारे तिथेही युवकांवर छाप पाडणे शक्य आहे. तसेच एखाद्या सदराद्वारे अपारंपारिक करिअर संधींची माहिती देता येईल. नव्या पुस्तकांच्या परिचयाला वाहिलेले एखादे सदर ठेवता येईल. याच्या जोडीलाच निबंध लेखन, 'काव्यांगण' हे सध्या सुरू असलेले उपक्रमही ठेवता येईल. 'युवा ट्रॅक'च्या पुढील कार्यास माझ्या शुभेच्छा.

**–वैभवी फातर्पेकर** (विद्यार्थीनी) सी. ई. एस. महाविद्यालय, कुंकळी.